**<u>निशाणी क्र.०५ आणि नि.क्र. २५ खालील एकत्रित आदेश</u>**

वादीने सदरचा दावा निरंतर मनाई हुकूमाकरिता दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा नि.क्र.०५ वरील अर्ज वादीने आणि नि.क्र.२५ वरील अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ व नियम १ व २ खाली तुर्तातूर्त मनाई हूकूम मिळणेकरीता दाखल केले आहेत.

३. **मिळकतीचे वर्णनः–**

डि. सोलापूर, ता. पंढरपूर पैकी शहर पंढरपूर येथील, सि.स.नं.४७५७/२१, क्षेत्र १६६.३ चौ.मी. सदरची मिळकत वादीच्या मालकीची असून सदर मिळकतीचे विस्तृत वर्णन दावा परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केलेले आहे. (यापुढे सदर मिळकतीस ‘दावा मिळकत’ असे संबोधण्यात येत आहे).

४. नि.क्र.०५ कडील अर्जाद्वारे वादीने प्रतिवादी यांच्याविरुध्द दावा मिळकतीतील शांततापूर्ण कब्जे वहिवाटीस प्रतिवादी क्र.१ ते ३ अथवा त्यांच्यामार्फत इतर कोणीही हरकत अडथळा करु नये तसेच प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीचे दावा मिळकतीच्या दक्षिणेकडील वहिवाटीच्या रस्त्याच्या जागेवर स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता सर्वे क्र.८८/४अ मध्ये बेकायदेशीररित्या तयार केलेले प्लॉट क्र.३१ ते ३४ या मिळकतींची विक्री करु नये, ति–हाईत इसमांचे हक्क निर्माण करु नये अशा आशयाची तूर्तातूर्त मनाई हुकूम देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी सदर अर्जावर नि.क्र.२३ कडे म्हणणे

दाखल करुन अर्जातील संपूर्ण कथने नाकारली आहेत.

६. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादी यांच्याविरुध्द नि.क्र.२५ कडे तूर्तातूर्त मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे. अर्जातील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे. सोलापूर, ता. पंढरपूर, शहर पंढरपूर येथील मनिषा नगर मधील गुंठेवारी प्लॉट

| | **सर्व्हे क्रमांक** | **क्षेत्र चौ.मी.** |
|---|---|---|
| १. | ८८/४/अ/३१ | २०५–०० |
| २. | ८८/४/अ/३२ | १५६–७५ |
| ३. | ८८/४/अ/३३ | १५४–६९ |
| ४. | ८८/४/अ/३४ | १५९–२५ |

(यापुढे सदर मिळकतींना ‘प्रतिदावा मिळकत’ असे संबोधण्यात येत आहे).

७. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे असे कथन आहे की, वादीने प्रतिदाव्यातील मिळकतीच्या प्रतिवादी यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीस स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये अशा स्वरुपाचे तूर्तातूर्त मनाई हुकूमाचे आदेश वादी यांच्याविरुध्द पारित करण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

८. दोन्ही विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. माझ्या समोर उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रथम दर्शनी प्रकरण कोणाच्या बाजूने आहे ? | **प्रतिवादींच्या बाजूने** |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाच्या हक्काचा समतोल कोणाच्या बाजूने आहे ? | **प्रतिवादींच्या बाजूने** |
| ३. | तुर्तातुर्त मनाई हूकूम न दिल्यास कोणाचे अपरिमीत नुकसान होणार आहे ? | **प्रतिवादींचे** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशानुसार** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ३ करिताः–

९. वादीने नि.क्र.०५ च्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, पंढरपूर शहर येथील सि.स.क्र.४७५७, प्लॉट क्र.२१ ही प्लॉट जागा वादीच्या खरेदीमालकीची असून सदरची मिळकत वादीच्या प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत आहे. सदर मिळकतीच्या पश्चिमेस उमा कॉलेज ते मनिषा नगर कडे जाणारा रस्ता असून उत्तरेस सि.स.क्र.४७५७/१७ आहे. वादीच्या प्लॉट क्र.२१ च्या पूर्वेस सि.स.क्र.४७५७/२२ ही मिळकत असून दक्षिणेस रस्ता आहे. वादीने सि.स.क्र.४७५७/२१ या प्लॉटमध्ये सन २०१५ मध्ये बांधकाम सुरु केले आहे. जानेवारी २०१७ मध्ये वादीने त्यांच्या सि.स.क्र.४७५७/२१ या प्लॉट जागेमध्ये नगर परिषदेकडून परवानगी घेऊन आर.सी.सी. बांधकाम पूर्ण केले व सदर मिळकतीमध्ये पंढरपूर ब्लड बँक या नावाने ब्लडबँक चालवत आहे. सदर ब्लडबँकेमध्ये व प्लॉट जागेमध्ये जा–ये करण्याकरिता वादीस सदर सि.स.क्र.४७५७/२१ या प्लॉटच्या पश्चिमेकडील रस्त्यावरुन व दक्षिणेकडील रस्त्यावरुन लोखंडी गेटने पूर्वीपासून ते आजपर्यंत वहिवाट आहे. असे

असताना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीविरुध्द पंढरपूर न्यायालयामध्ये नियमित दिवाणी दावा क्र.६७८/२०१७ दाखल केला व त्यानंतर दिनांक ०७/०७/२०१८ रोजी सदरचे प्रकरण बिनशर्त काढून घेतले.

१०. वादी पुढे असे कथन करतो की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची मिळकत सि.स.क्र.८८/४अ ही वादीच्या सि.स.क्र.४७५७/२१ च्या दक्षिणेकडे असलेल्या रस्त्याच्या दक्षिण बाजूस आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे सि.स.क्र.८८/४अ व वादीचे सि.स.क्र.४७५७/२१ चे दरम्यान पूर्वपश्चिम जाणारा रस्ता पूर्वीपासून अस्तित्वात आहे व सदर रस्त्याचा वापर पूर्वीपासून वहिवाटीकरिता होत आहे. असे असताना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी सि.स.क्र.८८/४अ या मिळकतीच्या उत्तरे कडील म्हणजेच वादीच्या सि.स.क्र.४७५७/२१ च्या दक्षिणेकडील असणारे पूर्व पश्चिम चालीच्या रस्त्याचे अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न केला व सदर रस्ता हा रस्ता नसून प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची प्लॉट जागा आहे असे खोटे सांगून प्रतिवादी क्र.१ ते ३ सदर रस्ता बळकावू पाहात आहेत.

११. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन महसूल अधिका–यांशी संगनमत करुन दिनांक १८/०६/२०१५ रोजी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांच्याकडे तसेच जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर यांच्याकडे खोटे अर्ज तयार करुन बनावट कागदपत्रे देऊन खोटी माहिती देऊन दावा मिळकतीच्या दक्षिणेकडे असणा–या रस्त्याचे अस्तित्व नष्ट करण्याचे प्रयत्न वादीच्या अपरोक्ष सुरु केले आहे. सदरची बाब वादीस व रस्त्यालगतच्या प्लॉट धारकांना समजल्यानंतर वादीने सि.स.क्र.४७५७/२२ चे प्लॉट

धारक उत्कर्ष जाधव यांनी त्यास हरकत नोंदवली. तसेच दिनांक १६/०८/२०१६ रोजी वादीने भूमी अधिक्षक, पंढरपूर यांच्याकडे अर्ज देऊन प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दिनांक १८/०६/२०१५ रोजी दिलेला अर्ज शासनाची फसवणूक करणारा आहे असे कळविले असता त्यांनी त्या अर्जावर चौकशीकामी तारीख नेमा असा शेरा मारला. परंतू वादीला म्हणणे दाखल करण्याची संधी न देता खोटे रेकॉर्ड तयार करुन क्र.न.भू./प.भू./२ पंढरपूर/ला.न. दुरुस्तीबाबत/२०१७ पंढरपूर दिनांक २२/०९/२०१७ रोजीच्या आदेशाने सि.स.क्र.४७५७/१ ते ४७५७/२२ या गृहनिर्माण संस्थेच्या दक्षिण बाजूस नमूद रस्ता ही संज्ञा कमी करुन प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थिती व सहाय्यक संचालक नगररचना सोलापूर यांच्याकडे रेखांकन/पंढरपूर /सर्वे क्र.८८/२क/३८४१ दिनांक ०६/११/१९८७ चे मंजूर रेखांकनाप्रमाणे दक्षिण बाजूस लागू सर्वे क्र.८८/४ असे आदेशाने नमूद करण्यात येत आहे असे आदेश पारित केले. वादी पुढे असे कथन करतो की, सदरचा आदेश मूलतः बेकायदेशीर असून प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीचे व सि.स.क्र.४७५७/१ ते ४७५७/२२ च्या प्लॉट धारकांच्या संमतीशिवाय गुन्हेगारी स्वरुपाची बेकायदेशीर कृत्ये केलेली आहेत. वादीने प्रस्तुतचा प्लॉट प्लॉटच्या दक्षिण आणि पश्चिम बाजूस रस्ता असल्याने प्लॉटची किंमत देऊन खरेदी केला आहे. सदर खरेदीखतामध्ये दक्षिणेस रस्ता असे नमूद आहे. असे असताना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा मिळकतीच्या दक्षिणेस असणारी रस्ता ही संज्ञा कमी करुन त्या ठिकाणी सर्वे क्र.८८/४ ही मिळकत असल्याचे नमूद केले आहे व सदर आदेशाच्या आधारे

प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी रस्त्याच्या जागी प्लॉट क्र.३१ ते ३४ तयार करुन ते विक्रीस काढले आहेत. प्रतिवादींच्या सदर कृत्यामुळे वादी यांचे दक्षिणेकडील रस्त्याचे अस्तित्व संपुष्ठात येणार आहे. प्रतिवादी यांनी सदर रस्त्यावर कंपाऊंड बांधण्याचे व चारी खोदण्याचे काम चालू करत आहे व रस्त्याचे अस्तित्व संपुष्ठात आणत आहे. वादीने प्रतिवादी यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतू प्रतिवादी यांनी सदरची बाब अमान्य केली.

१२. वादीने तूर्तातूर्त मनाई हुकूमाच्या अर्जाकामी कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. वादीने नि.क्र.०४ सोबत दावा मिळकतीसंदर्भात झालेला दस्त क्र.२४३७/२०१५, ४६१६/२०१०, ६१३५/१९९८ हे खरेदीदस्त दाखल केलेले आहेत. वादीने युक्तिवादामध्ये असे कथन केले आहे की, सदर खरेदीखतांमध्ये मिळकतीच्या चतुःसिमांमध्ये दक्षिणेकडे रस्ता ही संज्ञा नमूद आहे. वादीने याकामी सन १९९८ चे खरेदीखत दाखल केले आहे. त्यामध्ये दक्षिणेस रस्ता ही संज्ञा नमूद आहे. सदर कागदपत्रांवरुन दावा मिळकतीच्या दक्षिणेस रस्ता अस्तित्वात होता ही बाब अभिलेखावर प्रथमदर्शनी सिध्द होते. त्यानंतर वादीने त्याच्या कथनांच्या पुष्ठयर्थ सि.स.क्र.४७५७/१ ते ४७५७/२२ या मिळकतीचा भूमी अभिलेख यांच्याकडील नकाशा दाखल केला आहे. सदर नकाशामध्ये दावा मिळकतीच्या दक्षिणेस रस्ता अस्तित्वात असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर वादीने याकामी उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांच्याकडील दिनांक २२/०९/२०१७ रोजीचा आदेश दाखल केला आहे. सदर आदेशान्वये उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांनी सि.स.क्र.४७५७/१ ते ४७५७/२२

या भूमी अभिलेख कार्यालयाकडून करण्यात आलेल्या मोजणी आलेखावरुन दक्षिण बाजूस रस्ता ही संज्ञा कमी करुन प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थिती व सहाय्यक संचालक नगररचना सोलापूर यांच्याकडील मंजूर रेखांकनाप्रमाणे दक्षिण बाजूस लागू सर्वे क्र.८८/४ असे या आदेशाद्वारे नमूद करण्यात येत आहे असे आदेश पारित केले आहे.

१३. प्रतिवादींनी वादीच्या सदर कागदोपत्री पुराव्यास व मौखिक युक्तिवादास आव्हानित केलेले आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, सन २०१७ पर्यंत दावा मिळकतीच्या दक्षिणेस रस्ता ही संज्ञा नमूद होती. त्यामुळे वादीने दाखल केलेल्या खरेदीखतांमध्ये दावा मिळकतीच्या दक्षिणेस रस्ता ही संज्ञा नमूद आहे. परंतू त्यानंतर प्रतिवादी यांनी सदरची बाब उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांच्याकडे आव्हानित केली व रस्ता ही संज्ञा कमी करण्याची विनंती केली व सदर अर्जान्वये उपअधिक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांनी दावा मिळकतीच्या दक्षिणेकडील रस्ता ही संज्ञा कमी करुन १९८७ च्या मंजूर रेखांकनाप्रमाणे दक्षिण बाजूस लागू सर्वे क्र.८८/४ असे नमूद करण्याचे आदेश पारित केले.

१४. वादीने नि.क्र.०४ सोबत सदर आदेशाची प्रत हजर केली आहे. सदरचा आदेश उपअधिक्षक, भूमी अभिलेख पंढरपूर यांनी दिनांक २२/०९/२०१७ रोजी पारित केल्याचे दिसून येते. सदरचा आदेश सन २०१७ मध्ये पारित झालेला आहे. सदर आदेशाविरुध्द वादी यांनी कुठेही अपील दाखल केलेले नाही. तसेच वादीने या दाव्यामध्ये देखील सदरचा आदेश आव्हानित केलेला

नाही. त्यामुळे दावा मिळकतीच्या दक्षिणेस रस्ता आज अस्तित्वात आहे ही बाब वादीने प्रथमदर्शनी अभिलेखावर सिध्द केलेली नाही. त्यामुळे वादीच्या लाभात प्रथमदर्शनी दावा नाही.

१५. याउलट प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या फेरफार क्र.१९१६९ व अंतिम ले आऊट मंजूर नकाशाचे अवलोकन केले असता प्रतिवादींनी प्रतिदावा मिळकत विकसित करण्याचे योजले असल्याचे दिसून येते. सदर प्रतिदावा मिळकतीमध्ये वादी यांचा हक्क अधिकार नाही. प्रतिवादींनी दाखल केलेल्या उपअधिक्षक, भूमी अभिलेख पंढरपूर यांच्याकडील मो.र.क्र.१३/२०१४ चे अवलोकन केले असता सि.स.क्र.४७५७ म्हणजेच दावा मिळकतीच्या दक्षिणेस प्रतिदावा मिळकत असल्याचे दिसून येते. सदर मिळकतीमध्ये वादी यांचा कोणताही हक्क अधिकार नाही. असे असताना वादीस प्रतिवादी यांच्या मिळकतीमध्ये हस्तक्षेप करता येणार नाही. प्रतिदावा मिळकत ही प्रतिवादी यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१६. सदर प्रकरणामध्ये न्यायाच्या समतोलाचा विचार केल्यास सदरचा समतोल हा प्रतिवादी यांच्या लाभात आहे. कारण प्रतिवादींनी योग्य कार्यालयासमोर अर्ज दाखल करुन दावा मिळकतीच्या दक्षिणेकडे असणारा रस्ता ही संज्ञा कमी करुन त्याठिकाणी सर्वे क्र.८८/४ असल्याचे दुरुस्ती करुन घेतली आहे. सदर आदेश हा वादीने कुठेही आव्हानित केलेले नाही. प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जाचा निकाल सन २०१७ साली लागल्याचे दिसून येते. त्यानंतर देखील वादीने

सदरचा आदेश कुठेही आव्हानित केले नाही असे अभिलेखावरुन दिसून येते. वादीने असे कथन केले आहे की, दावा मिळकतीच्या दक्षिणेस पूर्वीपासून रस्ता आहे. परंतू आजच्या परिस्थितीचा विचार केल्यास दावा मिळकतीच्या दक्षिणेस असणारी रस्ता ही संज्ञा संबंधित महसूल कार्यालयाने नियमानुसार कमी करुन त्या ठिकाणी प्रतिदावा मिळकतीची नोंद नमूद केले आहे. सदरची प्रतिदावा मिळकत ही प्रतिवादी यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीच्या विकासापासून प्रतिवादी यांना अलिप्त ठेवल्यास प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार दावा मिळकतीच्या दक्षिणेकडील पूर्वी अस्तित्वात असणारा रस्ता हा केवळ प्रतिवादी एकटेच वापरत होते असे नाही. परंतू सदरचा रस्ता मिळकत गट क्र.४७५७/२२, ४७५७/१९ आणि ४७५७/२० हे धारक देखील वापरत होते. परंतू सदर धारकांनी प्रतिवादींच्या कृत्याबाबत कोणतीही हरकत नोंदवली नाही. वादीच्या दक्षिणेकडील रस्ता ही संज्ञा महसूल अधिका–यांनी दुरुस्त केलेली आहे. तसेच वादीला पश्चिमेकडून देखील रस्ता असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ हे प्रतिवादीच्या लाभात असल्याबाबतच्या निष्कर्षाप्रत आले आहे आणि मुद्दा क्र.४ करीता खालील खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा नि.क्र.०५ कडील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा नि.क्र.२५ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| ३. | प्रतिदाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो वादीने प्रतिदावा मिळकती अ,ब,क,ड मधील प्रतिवादींच्या मालकी व कब्जे वहिवाटीस स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अडथळा निर्माण करुन नये, धोका निर्माण करु नये, नुकसान होईल असे कोणतेही कृत्य करु नये अशी वादीस तूर्तातूर्त ताकीद देण्यात येत आहे. |
| ४. | अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसणेचा आहे. |
| ५. | दोन्ही पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी. |

PRIYANKA RAMESH PATIL

Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2026.04.27 16:13:50 +0530

दिनांकः– २७.०४.२०२६

(पी. आर. पाटील)
५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर.

# Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 5th Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 27.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 27.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 27.04.2026 |